जनसंपर्क कक्ष
0 2 MAR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बोलण्याचं गाणं झालं पाहिजे आणि शरीराचा वारा : तुषार भद्रे

- **शिवाजी विद्यापीठात 'आवाज जोपासना' कार्यशाळा उत्साहात**



कोल्हापूर : 'आवाज जोपासना' नाट्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना तुषार भद्रे.

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'आवाज जोपासना' ही दोन दिवसीय विशेष नाट्य कार्यशाळा झाली. २६ व २७ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या या कार्यशाळेत सातारा येथील ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक, लेखक आणि आवाज साधना तज्ज्ञ तुषार भद्रे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आवाजाच्या सूक्ष्म पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला.

भद्रे यांनी विद्यार्थ्यांनी पोटातून, छातीतून आणि कंठातून आवाज कसा लावावा, तसेच श्वास घेताना बोटांच्या मुद्रांचा वापर कसा होतो, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच नाटकात काम करताना आवश्यक असणारे 'स्विच ऑन-स्विच ऑफ' तंत्र आणि 'कॅरेक्टर बँक' तयार करण्यासाठी निरीक्षणाचे महत्त्व यावरही या कार्यशाळेत चर्चा केली. प्रास्ताविक व स्वागत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. किरणसिंह चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनात डॉ. संजय तोडकर, रविदर्शन कुलकर्णी, विकास कांबळे, राज पाटील, अतुल परीट आणि मल्हार जोशी यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यशाळेसाठी जयसिंग पाटील, सागर अध्यापक, प्रमोद कुलकर्णी, उज्वला खांडेकर, डॉ. अनमोल कोठाडिया यांच्यासह विद्यार्थी आणि नाट्यप्रेमी उपस्थित होते.

0 2 MAR 2026

Times of India

# SUK invites applications for exams

**Kolhapur:** The process to invite the applications for entrance exams to be held for the admissions to graduate, post-graduate, integrated and interdisciplinary courses of Shivaji University Kolhapur (SUK) has been started and last day for the submitting the application is March 27.

जनसंपर्क कक्ष
0 2 MAR 2026 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रचनात्मक शिक्षणातून समावेशन शक्य

▪ प्रा. रेणू दांडेकर

▪ शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

संवेदनशील, रचनात्मक शिक्षण व्यवस्थेतूनच खऱ्या अर्थाने सामाजिक समावेश शक्य आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या लोकसाधना संस्थेच्या संस्थापक प्रा. रेणू दांडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित 'कोणीही मागे राहू नये: सामाजिक समावेशासाठी शिक्षणाचा पुनर्विचार या राष्ट्रीय परिसंवादात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डी. ए. सावकार अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. अशोक कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. दांडेकर म्हणाल्या, निर्मितीक्षम आणि रचनात्मक शिक्षणच सर्वांना सक्षम करणारे व सामाजिक समावेशन घडविणारे ठरते. शिक्षणाचा पुनर्विचार करताना 'माणूसपण' जपणारे शिक्षण देणे ही काळाची गरज असून संवेदनशील शिक्षकच त्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावू शकतात. विद्यार्थ्यांना शिक्षण प्रक्रियेत स्वातंत्र्य, नवदृष्टी आणि बौद्धिक संधी मिळाल्यासच त्यांचे सामाजिक समावेशन शक्य होईल.

डॉ. अशोक कांबळे म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. तरच निष्पत्तीआधारित मूल्यमापनातून शिक्षणाचा सामाजिक समावेशनासाठी उपयोग होईल. डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, औपचारिक शिक्षण घेतले नाही म्हणून एखादी व्यक्ती अयोग्य ठरत नाही. शिक्षणाचा सामाजिक समावेशनासाठी सकारात्मक दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक आहे.

अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. यावेळी बनारस हिंदू विद्यापीठ येथील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. जे. बी. कोमाराईह, शिवाजी राऊत, डॉ. राजू श्रावस्ती, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. केदार मारुलकर, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. सुप्रिया पाटील, शरद पाटील आदी उपस्थित होते.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात डॉ. निकोल्या मेंडसे (गोवा), डॉ. प्रशांत बनसोडे (पुणे), डॉ. जयानंद खंडागळे (संभाजीनगर), प्रा. डी. श्रीकांत (कर्नाटक), प्रा. शंकरनारायण पालीरी (केरळ), डॉ. मोझीन्हा फर्नांडिस (गोवा) यांच्यासह सामाजिक समावेशन व शिक्षण या विषयांवरील देशभरातील तज्ज्ञ, संशोधक व अभ्यासक सहभागी झाले आहेत.

0 2 MAR 202

जनप्रवास

# डॉ. आलोक जत्राटकर यांच्या पुस्तकाला राजारामबापू पाटील साहित्य पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी तथा लेखक डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' या ललित लेखसंग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) यांच्या ईश्वरपूर शाखेच्या वतीने देण्यात येणारा लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय २०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील, प्रा. दीपक स्वामी यांनी पुरस्कारांची घोषणा केली. 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' मध्ये निवडक ३० लेखांचा समावेश आहे.



0 2 MAR 2026
लोकमत

# शिक्षणातूनच सामाजिक समावेशन शक्य : रेणू दांडेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संवेदनशील, रचनात्मक शिक्षण व्यवस्थेतूनच खऱ्या अर्थाने सामाजिक समावेश शक्य आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या लोकसाधना संस्थेच्या संस्थापक प्रा. रेणू दांडेकर यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित "कोणीही मागे राहू नये : सामाजिक समावेशासाठी शिक्षणाचा पुनर्विचार" या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन समारंभात बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. तर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डी. ए. सावकार अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. अशोक कांबळे उद्घाटक होते.

डॉ. अशोक कांबळे म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे.

बनारस हिंदू विद्यापीठ येथील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. जे. बी. कोमाराईह यांची प्रमुख उपस्थिती होती. अविनाश भाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. या वेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, शिवाजी राऊत, डॉ. राजू श्रावस्ती उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 2 MAR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धोरणात्मक निर्णयामध्ये सर्वेक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण

- डॉ. गीता सिंग यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय अर्थमिती परिषदेची सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक संशोधनाबरोबरच शासकीय आणि संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात



**कोल्हापूर : सांगता समारंभात बोलताना डॉ. गीता सिंग राठोड.**

त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर होते. बँक ऑफ इंडियाच्या व्हाईस चेअरमन डॉ. उषा थोरात व प्रा. डॉ. व्ही. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होते.

डॉ. गीता सिंग राठोड म्हणाल्या, भारताला अशा तरुण विद्वानांची गरज आहे, जे तांत्रिक कौशल्य आणि सामाजिक उद्देशाची सांगड घालू शकतील. डॉ. उषा थोरात म्हणाल्या, सन १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे देशाने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आणि चलन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. तेव्हापासून देशाच्या अर्थव्यवस्थेने आपल्या प्रगतीचा वेग कायम राखला आहे. यावेळी डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.

0 2 MAR 2026
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांनी ज्ञान आत्मसात करावे : डॉ. कलावते

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उपक्रमाची सांगता

**कोल्हापूर :** विकसित भारताच्या जडणघडणीमध्ये महिलांचे मोलाचे योगदान राहणार असून, त्यासाठी त्यांनी संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता यासह विज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (पुणे) येथील वरिष्ठ संशोधक डॉ. अपर्णा कलावते यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित तीनदिवसीय राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या सांगता समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या, तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. एस. आर. यन्कंची उपस्थित होते.

डॉ. अपर्णा कलावते म्हणाल्या, केंद्र सरकारने यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची मध्यवर्ती संकल्पनाच 'विज्ञान क्षेत्रातील महिला : विकसित भारतासाठी प्रेरक शक्ती' अशी ठेवली आहे.

यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. डॉ. सुनील गायकवाड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी उपक्रमाचा अहवाल सादर केला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नितीन कांबळे यांनी आभार मानले.

0 2 MAR 2026
सकाळ

# विद्यापीठे ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे बनावीत

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे आवाहन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'विद्यापीठे केवळ पदवीदानची केंद्रे न राहता ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे बनली पाहिजेत', अशी अपेक्षा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद व कऱ्हाड येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयातर्फे कऱ्हाड येथे झालेल्या २८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

चव्हाण म्हणाले, 'समाजात परिवर्तन घडविण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन आणि इतिहासाचे सकारात्मक संशोधन या दोन बाबींची महत्त्वाची जाणीव असणारे नेतृत्व विकसित होण्याची आवश्यकता आहे. सुजाण नेतृत्वाला समाजशास्त्राची जाण आणि भान असणे महत्त्वाचे असते. विद्यापीठांच्या माध्यमातून संशोधनाच्या नव्या वाटा खुल्या झाल्या पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने इतिहास संशोधन अधिक व्यापक होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र संशोधन निधी निर्माण करणे आवश्यक आहेच. पण, उद्योजकांनीही संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे. मराठा इतिहास समाजासमोर प्रभावीपणे मांडायचा असेल, तर मोडी कागदपत्रांचा शास्त्रशुद्ध अभ्यास अपरिहार्य आहे.'

डॉ. पाटील म्हणाले, 'इतिहासकार विज्ञाननिष्ठ असला पाहिजे. इतिहासलेखनात वस्तुनिष्ठता, चिकित्सक दृष्टी आणि निर्भीडपणाही आवश्यक असून इतिहास लेखन हे भावनांपेक्षा पुराव्यांवर आधारित असावे.'

याप्रसंगी इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, अॅड. रवींद्र पवार, डॉ. संदीप महाजन, डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेखा पाटील, डॉ. अजित पवार उपस्थित होते. डॉ. अभयकुमार पाटील यांनी आभार मानले.

0 2 MAR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धोरणात्मक निर्णयांमध्ये सर्वेक्षणांची भूमिका महत्त्वाची

## डॉ. गीता सिंग राठोड; राष्ट्रीय अर्थमिती परिषदेची विद्यापीठात सांगता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शैक्षणिक संशोधनाबरोबरच शासकीय आणि संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी व्यक्त केले.**

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर होते, तर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. उषा थोरात आणि प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. राठोड म्हणाल्या, रोजगार पद्धती, उद्योग गतिशीलता, औद्योगिक कामगिरी आणि गुंतवणूक वर्तन हे भारताच्या आर्थिक परिवर्तनाचे मुख्य प्रवर्तक घटक आहेत. ते नेमकेपणाने समजून घेण्याच्या कामी सर्वेक्षणे मदत करतात. चांगले संशोधन चांगल्या डेटाच्या उपलब्धतेमुळे सुरू होते. मजबूत आकडेवारी हे भारताचे बलस्थान आहे. सर्वेक्षणांमुळे धोरणात्मक निर्णयदेखील अधिक प्रभावी झाल्याचे दिसतात. सांख्यिकी आपल्याला तथ्ये देते, अर्थमिती आपल्याला स्पष्टता देते आणि एकत्रितपणे ते समाजाला सुज्ञपणे निवड करण्याचा आत्मविश्वास देतात. भारताला अशा तरुण विद्वानांची गरज आहे, जे तांत्रिक कौशल्य आणि सामाजिक उद्देशाची सांगड घालू शकतील. सांख्यिकीय माहितीच्या आधारे आपणास कोणत्याही क्षेत्रातील विश्लेषण करता येते. नियोजन आणि प्रगतीसाठी त्याचा उपयोग होतो.



डॉ. उषा थोरात म्हणाल्या, सन १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे देशाने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आणि चलन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. तेव्हापासून देशाच्या अर्थव्यवस्थेने आपल्या प्रगतीचा वेग कायम राखला आहे.

यावेळी डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले, तर भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 2 MAR 2026 जनप्रवास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धोरणात्मक निर्णयांमध्ये सर्वेक्षणांची भूमिका महत्त्वाची

- डॉ. गीता सिंग राठोड यांचे मत
- राष्ट्रीय अर्थमिती परिषदेची विद्यापीठात सांगता

**जनप्रवास : कोल्हापूर**

शैक्षणिक संशोधनाबरोबरच शासकीय आणि संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी (६० व्या) वार्षिक



**भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात बोलताना डॉ. गीता सिंग राठोड.**

राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर होते. तर डॉ. उषा थोरात आणि प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. गीता सिंग राठोड म्हणाल्या, रोजगार पद्धती, उद्योग गतिशीलता, औद्योगिक कामगिरी आणि गुंतवणूक वर्तन हे भारताच्या आर्थिक परिवर्तनाचे मुख्य प्रवर्तक घटक आहेत. ते नेमकेपणाने समजून घेण्याच्या कामी सर्वेक्षणे मदत करतात. चांगले संशोधन चांगल्या डेटाच्या उपलब्धतेमुळे सुरु होते. मजबूत आकडेवारी हे भारताचे बलस्थान आहे. सर्वेक्षणांमुळे धोरणात्मक निर्णय देखील अधिक प्रभावी झाल्याचे दिसतात. सांख्यिकी आपल्याला तथ्ये देते, अर्थमिती आपल्याला स्पष्टता देते आणि एकत्रितपणे ते समाजाला सूज्ञपणे निवड करण्याचा आत्मविश्वास देतात.

यावेळी डॉ. उषा थोरात, डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. तर, भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.